मुंबई ▪ सांगली ▪ कोल्हापूर ▪ नवे विचार...नवी सुरुवात ▪ RNI NO. MAHMAR/2020/79996

दैनिक

# हॅलो प्रभात

▪ मुख्य संपादक : गणेश पाटील (सावर्डेकर) Mo. 9011889001

▪ सांगली ▪ कोल्हापूर ▪ सातारा ▪ पुणे ▪ अहिल्यानगर ▪ वर्ष : ६ ▪ अंक : १११ ▪ शुक्रवार, २५ जुलै २०२५ ▪ किंमत : ३ रुपये ▪ पाने : ४




# जिल्ह्यात महायुतीपुढे मविआचा महापाडाव ?

## काँग्रेसचं अख्खं जहाजच भाजपच्या समुद्रात

**सांगली : गणेश पाटील**

**महाविकास आघाडीतील शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या रूपाने तग धरण्याचा प्रयत्न करत आहे. आ. जयंतराव पाटील त्या दृष्टिकोनातून तयारीला लागले असतानाच काँग्रेसला आता आणखी एक धक्का बसण्याचे संकेत मिळू लागलेले आहेत. काँग्रेस नेत्या जयश्रीताई पाटील आपल्या माजी नक्षरसेवक समर्थकांसह भाजपात डेरेदाखल झाल्या.**

जयश्रीताई भाजपत कधीच जाणार नाहीत, असे वाटत असतानाच त्यांनी कमळ हातात घेतले. वास्तविक अजितदादांच्या राष्ट्रवादीची नजर जयश्रीताईवर होती. जयश्रीताई राष्ट्रवादीत आल्या तर राष्ट्रवादीची सांगलीत ताकद वाढेल असेच ते गणित होते. परंतु पुढील राजकीय गणित ओळखूनच भाजपने डाव टाकून त्यांना आपल्याकडे घेतले. आता काँग्रेसमधील आणखी एक फलटन भाजपात येऊ पाहत आहे. संपूर्ण काँग्रेसचे अख्खे जहाजच भाजपच्या समुद्रात विलिन होत असल्याचे चित्र लवकरच दिसेल.

केंद्रात व राज्यात भाजपचे सरकार असल्यामुळेच भाजपकडे ओढा वाढतो आहे. असे सकृतुर्शनी दिसत असले तरी राजकीय जाणकारांच्या मते मात्र गणित वेगळेच आहे.

समर्थक जेव्हा एखादा निर्णय घेतात, तेव्हा त्यामागे नेत्याचा इशारा असतो. एखादा विशिष्ट निर्णय घेण्यामुळे त्या नेत्याचा भविष्यकाळातील दूरदर्शीपणा असू शकतो. काँग्रेसमधील जी झुंड नव्याने भाजपात डेरेदाखल होत आहे त्याला घर का भेदी जबाबदार असावा असाही अंदाज व्यक्त केला जात आहे. आ.डॉ.विश्वजीत कदम यांच्या दृष्टिकोनातून स्थानिक स्वराज्य संस्थेची ही निवडणूक प्रतिष्ठेची निवडणूक आहे. काँग्रेसचे जिल्ह्यात अस्तित्व राहिले तरच त्यांचे अस्तित्व टिकून राहणार आहे, त्या दृष्टीकोनातूनच त्यांचे प्रयत्न राहणार आहेत, परंतु काँग्रेसमधील ज्यांनी भाजपात जाण्यास प्रवृत्त केले त्यांचा शोध आता घेतला जात आहे.

राष्ट्रवादी शरद पवार पक्ष, उरली सुरली काँग्रेस आणि उमेदवारी न मिळाल्यामुळे नाराज होणारे महायुतीतील बंडखोर या पुंजीवरच आगामी महापालिका निवडणूक लढविण्याचे मनसुबे आ. जयंतराव पाटील यांनी बांधले असावेत परंतु संपूर्ण काँग्रेसच जर नामशेष झाली तर मात्र एकट्याच्या ताकदीवर लढणे आ.जयंतराव पाटील यांच्या दृष्टिनेदेखील सोपे असणार नाही त्यासाठी नवीन आखडे तयार करावे लागतील आणि ते आ.जयंतराव पाटील करतील असेही जाणकार बोलत आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा ज्वर आता चांगलाच वाढला आहे. २०१८ च्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने ३८ जागांवर विजय मिळिवला होता, तर भाजपच्या मित्रपक्षांचे तीन उमेदवार विजयी झाले होते. आता मात्र संपूर्ण राजकारणाची दिशा बदलली असून जयश्रीताई पाटील भाजपात आल्या, तसेच नव्याने काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पक्षातील काही नेते हातात कमळ घेणार असल्यामुळे राजकीय तिढा अधिकच घट्ट बसणार आहे. जयश्रीताई पाटील यांच्याबरोबर आलेल्या व काँग्रेसमधील नव्याने भाजपत येणाऱ्या मातब्बरांना उमेदवारी ही भाजपला द्यावीच लागणार आहे. ७८ सदस्यांच्या महापालिकेसाठी जयश्रीताईंच्या माजी नगरसेवकांची संख्या मिळिवली तर भाजपची आताची सदस्यसंख्याच ५२ होती, तर मित्रपक्षांचे तीन सदस्य जमेस धरता ती ५५ होते. त्यात यावेळी भाजपचा मित्रपक्ष असलेला जनसुराज्य पक्ष अधिक नसल्यातरी सात जागा मागू शकतो, आणि पाच जागांवर तडजोडही होऊ शकते.

२०१८ सालच्या महापालिका निवडणुकीत एकसंघ राष्ट्रवादी १६ जागांवर तर काँग्रेस १९ जागांवर विजयी झाली होती. अजितदादांच्या राष्ट्रवादीकडून देखील अस्वस्थ नगरसेवकांना गळ टाकण्याचा प्रयत्न होतच आहे. अशा स्थितीत सर्वात अधिक नाराजी महायुतीत उमटणार आहे, त्यावेळच्या स्थितीचा फायदा घेण्याचा विचार निश्चितच आ. जयंतराव पाटील करत असतील,पण नव्यानेच कमळ हातात घेण्यासाठी काँग्रेसमधील काही माजी नगरसेवक इच्छूक असल्यामुळे महायुतीचा मार्ग अधिकच सूकर होणार आहे.

महाविकास आघाडी अस्तित्वासाठी झगडत असतानाच काँग्रेसमधून होत असलेले आऊट गोईंग महाविकास आघाडीच्या दृष्टिकोनातून घातक आहे. काँग्रेसमधील काही नेत्यांच्या महत्वाकांक्षा वाढीस लागलेल्या आहेत, त्यामुळेच तर हे प्रकार घडत आहे. एकंदरीत हा आ.डॉ.विश्वजीत कदम यांना सेटबॅक देण्याचा प्रयत्न आहे, की राष्ट्रवादी आता कैचीत सापडली आहे, या पक्षाच्या नेत्यांना अडचणीत आणण्याचा हा डाव आहे अशा उलट-सुलट चर्चा सुरू झाल्या आहेत.

तुमचं वृत्तपत्र आता तुमच्या मोबाईलवर!

खालील QR कोड स्कॅन करा आणि आजचा e-paper वाचा.


हॅलो प्रभात

सोबत वाचनाचा नवा डिजिटल अनुभव

सहज,जलद आणि स्मार्ट!

## डीकेटीईच्या ५० विद्यार्थ्यांनीची आयटी कंपनीमध्ये निवड

**इचलकरंजी : हॅलो प्रभात**



डीकेटीईच्या टेक्स्टाईल ॲण्ड इंजिनिअरींग इन्स्टिटयूट इंजिनिअरींग विभागातील एकूण ५० विद्यार्थ्यांनींनी आपली गुणवत्ता सिध्द करत, विविध आघाडीच्या कॅपजेमिनी, इन्फोसिस या आयटी कंपन्यांमध्ये यशस्वीरीत्या प्लेसमेंट मिळवून संस्थेच्या इतिहासात एक गौरवशाली नोंद केली आहे. ही निवड डीकेटीई संस्थेने गुणवत्तापूर्ण शिक्षणपध्दतीची, आधुनिक तंत्रज्ञानातील सक्षम प्रशिक्षणाची आणि मुलींच्या शिक्षणास दिलेल्या प्रोत्साहनाची साक्ष आहे संस्थेच्या संचालिका डॉ.एल.एस. अडमुठे यांनी यावेळी प्रतिक्रिया व्यक्त केली. कॅपजेमिनी या आंतरराष्ट्रीय कंपनीमध्ये ३७ विद्यार्थीनी तर इन्फोसीस या भारतातील प्रथितयश कंपनीमध्ये १३ विद्यार्थ्यांनींची निवड झाली आहे.

या गौरवशाली कामगिरीबददल संस्थाध्यक्ष कल्लाप्पाण्णा आवाडे, माजी मंत्री प्रकाश आवाडे, मानद सचिव डॉ. सपना आवाडे, कार्यकारी संचालक रवी आवाडे व सर्व ट्रस्टी यांनी विद्यार्थ्यांनींचे अभिनंदन करीत त्यांना उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या यशस्वी घडामोडीमध्ये संचालिका डॉ. एल.एस.अडमुठे, उपसंचालक डॉ.यु. जे.पाटील, सर्व विभागप्रमुख, टीपीओ प्रा.जी.एस.जोशी व टीपीओ समन्वयक यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

## अनंतराव पवार अभियांत्रिकीत जेनरेटेव्ह एआयच्या सेंटर ऑफ एक्सलन्सची स्थापना



**पुणे : हॅलो प्रभात**

अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च महाविद्यालयातील आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स विभागामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत पुण्यातील पहिले जेनरेटेव्ह एआय आणि जेनटिक एआय चे सेंटर ऑफ एक्सलन्स सुरू करण्यात आले. हे सेंटर प्रोग्रेशन स्कूल आणि ॲक्सलरंट टेक्नॉलॉजीज व अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च पर्वती यांच्यासोबत करण्यात आलेल्या सामंजस्य करारांद्वारे स्थापन करण्यात आले. या सेंटर ऑफ एक्सलन्स च्या माध्यमातून एजंटीक एआय आधारित Full-Stack Develoment Programs राबवले जाणार आहेत. या करारावर प्रोग्रेशन स्कूल आणि ॲक्सलरंट टेक्नॉलॉजीज चे संचालक विवेक अग्रवाल आणि रोहित घोष, अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या सरचिटणीस प्रमिला गायकवाड व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनिल ठाकरे आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स विभाग प्रमुख प्रा.स्नेह साळवेकर यांनी स्वाक्षरी केल्या. हे सेंटर संशोधन, इनोव्हेशन आणि उद्योग-संलग्नतेसाठी एक शाश्वत व्यासपीठ ठरेल, अशी अपेक्षा गायकवाड वतीने व्यक्त केली.

या करारासाठी समन्वयक म्हणून प्रा. स्नेह साळवेकर यांनी काम पहिले. सूत्रसंचालन प्रा. अमोल नायकोजी यांनी तर आभारप्रदर्शन प्रा. वर्षा चव्हाण यांनी केले. सदर करारासाठी संस्थेच्या सरचिटणीस प्रमिला गायकवाड यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनिल ठाकरे व आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स विभागाच्या प्रमुख प्रा.स्नेह साळवेकर व सर्व प्राध्यापक याचे अभिनंदन केले.

## महिलानां योग्य मार्गदर्शन मिळाल्यास त्या जिल्ह्याचे अर्थकारण बदलू शकतात : अरुंधती महाडीक

**कोल्हापूर : आनिल पाटील**



महिलांच्या अंगी उपजत उद्योग व्यवसायाची क्षमता असते. अशा महिलांना योग्य मार्गदर्शन मिळाले, प्रशिक्षण मिळाले, तर या महिला कुटुंबाबरोबरच जिल्ह्याचे अर्थकारण बदलू शकतात. हा विश्वास मनामध्ये घेऊन, कोल्हापुरात २३ जुलै २००९ रोजी भागीरथी महिला संस्थेची स्थापना झाली. खा.धनंजय महाडिक यांच्या खांद्याला खांदा लाऊन, सामाजिक कार्यामध्ये अग्रेसर असलेल्या अरुंधती महाडिक यांच्या सक्षम नेतृत्वाखाली भागीरथी महिला संस्थेने गावागावात बचत गटाच्या महिलांना एकत्र केले आणि महिला सबलीकरणाच्या प्रवासाला सुरवात झाली. गेल्या १५ वर्षात भागीरथी महिला संस्थेने शेकडो उपक्रम राबवत, हजारो महिलांना स्वावलंबी, सक्षम, उद्योजिका आणि ज्ञानसमृध्द बनवले आहे, अशी माहिती संस्थेच्या अध्यक्षा अरूंधती महाडिक यांनी पत्रकार परिषदेत दिली. पुढे बोलताना सौ.महाडिक यांनी हिला संस्थेच्या १५ वर्षाच्या प्रवासाचा आढावा घेतला. महिलांनी उद्योग व्यवसायाकडे वळावे, या हेतूने भागीरथी महिला संस्थेच्यावतीने गेल्या १५ वर्षात शेकडो प्रशिक्षण शिबिरे घेण्यात आली. या शिबिरांना जिल्हयातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. १५ वर्षात ४ लाख महिलांना मोफत प्रशिक्षण देण्याबरोबरच मार्केटिंगची देखील सोय उपलब्ध करुन दिली. भागीरथी महिला संस्थेमार्फत महिला कैद्यांसाठी गणपती मूर्ती तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. या उपक्रमालाही मोठा प्रतिसाद मिळाला. जिल्हयातील महिलांनी व्यवसाय विषयक मार्गदर्शनासाठी रवी पाटील ९६ ७३ ८१ ९२ ९२ किंवा भागीरथी पतसंस्थेच्या सुप्रिया चौगले यांच्या ८४० ९९ ७५० ५० या क्रमांकाशी संपर्क साधण्याचे आवाहन सौ. अरूंधती महाडिक यांनी केले. पत्रकार परिषदेला वैष्णवी महाडिक, सौ. अंजली महाडिक, पृथ्वीराज महाडिक, विश्वराज महाडिक, कृष्णराज महाडिक, शरयू भोसले उपस्थित होत्या.

## संक्षिप्त...

### कोल्हापुरात मुसळधार पूरचिंता वाढली

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

जिल्ह्यात गेल्या २४ तासांपासून पुन्हा एकदा पावसाने जोर धरल्याने नद्यांच्या पाणीपातळीत झपाट्याने वाढ होऊ लागली आहे. पंचगंगा नदीची पाणीपातळी एका दिवसात दोन फुटांनी वाढली असून, नदी धोक्याच्या पातळीकडे वाटचाल करत आहे. या पार्श्वभूमीवर हवामान विभागाने जिल्ह्यासाठी 'रेड अलर्ट' जारी केला आहे, तर पुढील दोन दिवसांसाठी 'ऑरेंज अलर्ट' दिला असल्याने पूरस्थितीची चिंता वाढली आहे.

### अंगणवाड्यांना मिळेना अंगण

**सातारा : हॅलो प्रभात**

बालकांना शिक्षणाची ओळख निर्माण करून देणाऱ्या १ हजार ५२ अंगणवाड्या प्राथमिक शाळा, ग्रामपंचायत, समाज मंदिर, देवालय, खासगी व भाड्याच्या इमारतीमध्ये भरवल्या जात आहेत. खासगी संस्थांच्या तुलनेत अंगणवाडीमध्ये सर्वसामान्य नागरिकांचा ओढा असल्याने शासनाने अंगणवाड्यांसाठी हक्काची इमारत बांधण्याकडे लक्ष द्यावे. ४३४ अंगणवाड्या,या ठिकाणी चिमुकल्यांना ज्ञानार्जनाचे धडे गिरवावे लागत असून चिमुकल्यांना खेळण्यासाठी अंगण नाही.

## डी.वाय.पाटील च्या ५६० विद्यार्थ्यांना विविध कंपनीमध्ये नोकरी

### २७ लाखांचे सर्वोच्च पॅकेज : १८० हून अधिक नामांकित कंपन्यांचा सहभाग

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**




डी.वाय.पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाने ५६० हुन अधिक विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय-राष्ट्रीय कंपन्यांमध्ये उत्तम नोकरीची संधी मिळवून दिली आहे. यामध्ये २७ लाखांचे सर्वोच्च सॅलरी पॅकेज मिळाले असून सरासरी ४.५ लाखांचे पॅकेज विद्यार्थ्यांना मिळाले आहे. उत्कृष्ट शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्याच्या सर्वांगीण विकासावर भर दिला जात असल्याने यावर्षीही विक्रमी संख्येने प्लेसमेंट करता आल्याचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील व विश्वस्त ऋतुराज पाटील यांनी सांगितले.

यावेळी डॉ.पाटील म्हणाले, विद्यार्थ्याना सर्वोत्तम शिक्षण देतानाच, विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्याला दिशा देण्याचे काम केले जाते. गुणवत्ता, आधुनिक तंत्रज्ञान, आणि नैतिक मूल्यांचा समतोल राखत आम्ही विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर सक्षम बनवण्यासाठी कार्यरत आहोत. महाविद्यालयाच्या सामुहिक प्रयत्नामुळे हे यश मिळाले आहे.

ऋतुराज पाटील म्हणाले, महाविद्यालयाचा स्वायत्त दर्जा, नॅक व एनबीए मानांकन,उत्कृष्ट शैक्षणिक परंपरा यामुळे सर्वच क्षेत्रात विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. विद्यार्थ्याना नामवंत कंपनीमध्ये नोकरी मिळावी यासाठी सुरु असलेल्या प्रयत्नाना चांगले यश मिळाले आहे. यावर्षी सुमारे ५६० हून अधिक प्लेसमेंट करता आल्याचे समाधान आहे. डॉ.गुप्ता म्हणाले, यावर्षी १८० हून अधिक कंपन्यांनी कॅम्पस प्लेसमेंटमध्ये सहभाग घेतला. ४० हून अधिक विद्यार्थ्यांना ६ लाख तर सुमारे १५० विद्यार्थांनी ४ लाख पेक्षा जास्त सॅलरी पॅकेज मिळाले आहे. महाविद्यालयामध्ये ट्रेनिंग आणि प्लेसमेंट विभागातर्फे कंपन्यांची गरज ओळखून कोडिंग स्किल्स , गुगल डेव्हलपर क्लब, परदेशी भाषा, बिजनेस कम्युनिकेशन स्किल्स , सॉफ्ट स्किल आणि ॲप्टिट्यूड ट्रेनिंग दिले जाते. याचा चांगला फायदा विद्यार्थ्यांना प्लेसमेंटवेळी झाला. प्राचार्य डॉ.चेडे म्हणाले, विद्यार्थ्यांसाठी विविध क्लब, फ्रेंच, जर्मन आणि जापनीज भाषांचे कोर्सेस या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासासाठी तयारी करून घेतली जाते. तसेच विद्यार्थ्यांचा औद्योगिक विश्वाशी संबंध येणासाठी विविध सामंजस्य करार , समाजपयोगी प्रकल्प आणि इंटर्नशिप असे उपक्रम वर्षभर राबविले जातात. विविध कंपन्यात निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या सत्कार डॉ. संजय डी. पाटील व ऋतुराज पाटील यांच्याहस्ते करण्यात आला. यावेळी सी.एच. आर. ओ श्रीलेखा साटम यांच्यासह महाविद्यालयाचे सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक, प्लेसमेंट समन्वयक उपस्थित होते.

या निवडीकरता संस्थेचे अध्यक्ष डॉ.संजय पाटील, उपाध्यक्ष आ.सतेज पाटील, विश्वस्त ऋतुराज पाटील आणि कार्यकारी संचालक डॉ.गुप्ता, प्राचार्य डॉ.चेडे, रजिस्ट्रार डॉ. मालदे, प्रा. रविंद्र बेन्नी यांचे प्रोत्साहन व सहकार्य लाभले.








# वाटा प्रशासकीय सेवेच्या ; भाग १ - महाराष्ट्र लोकसेवा आयोग

**दै.हॅलो प्रभात**

अभियांत्रिकीचे शिक्षण घेत असताना किंवा पदवी पूर्ण झाल्यानंतर अनेक विद्यार्थ्यांपुढे असा प्रश्न उभा राहतो की, आपण खाजगी क्षेत्रात जावे की शासकीय सेवेकडे वळावे? काहीजण उत्तम पगाराच्या संधी शोधतात, तर काहीजण समाजासाठी काहीतरी करून दाखवण्याची इच्छा बाळगतात. याच पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या MPSC Engineering Services ही एक महत्त्वाची आणि आशादायक संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देते. केवळ तांत्रिक ज्ञानाचेच नव्हे, तर धोरणात्मक विचारसरणीचेही मूल्यमापन करणारी ही सेवा, राज्याच्या प्रशासकीय व्यवस्थेमध्ये अभियंत्यांना महत्त्वाची भूमिका बजावण्याची संधी देते.

MPSC म्हणजे महाराष्ट्र लोकसेवा आयोग. ही संस्था राज्य शासनाच्या विविध विभागांमध्ये अधिकारी वर्गाच्या नियुक्त्या करण्यासाठी स्पर्धा परीक्षा घेत असते. याच आयोगामार्फत अभियंत्यांसाठी घेतल्या जाणाऱ्या परीक्षेला MPSC Engineering Services असे संबोधले जाते. ही सेवा मुख्यतः सिव्हिल, मेकॅनिकल आणि इलेक्ट्रिकल शाखांतील पदवीधर अभियंत्यांसाठी खुली असते. या परीक्षेच्या माध्यमातून सहायक अभियंता, उपअभियंता, कार्यकारी अभियंता आणि उपविभागीय अभियंता अशा पदांवर नियुक्ती केली जाते. सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD), जलसंपदा विभाग (WRD), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (MJP), औद्योगिक विकास महामंडळ (MIDC), आणि विद्युत वितरण कंपन्यांमध्ये या पदांची गरज असते.

अनेकांना प्रश्न पडतो की अभियांत्रिकी पदवी घेतल्यावर प्रशासनात जाण्याची गरज काय? याचे उत्तर हे आहे की समाजाला शाश्वत विकासाची दिशा देण्यासाठी शासनाकडून होणाऱ्या प्रकल्पांची आखणी, बांधकाम आणि देखरेख ही जबाबदारी अभियंत्यांवरच असते. MPSC Engineering S>ervices मधील अधिकारी हा त्याच्या शाखेतील तांत्रिक ज्ञानासोबतच प्रशासनाचे मूलभूत तत्त्वही अंगीकारतो. अशा अधिकाऱ्यांच्या निर्णयामुळेच एखाद्या गावात पिण्याचे पाणी पोहोचते, रस्ते सुस्थितीत राहतात, पूल व इमारती सुरक्षित राहतात आणि नागरिकांच्या जीवनशैलीत सकारात्मक बदल होतो.

या सेवेमध्ये प्रवेश घेण्यासाठी उमदवाराने भारताचा नागरिक असणे आवश्यक आहे. उमेदवाराने सिव्हिल, मेकॅनिकल किंवा इलेक्ट्रिकल अभियांत्रिकीमध्ये मान्यताप्राप्त विद्यापीठातून पदवी प्राप्त केलेली असावी. वयोमर्यादा सामान्यात १९ ते ३८ वर्षे असून, मागासवर्गीय उमेदवारांना वयोगटात शिथिलता दिली जाते. मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक असून, महाराष्ट्रातील प्रशासनाच्या विविध पातळ्यांवर काम करताना स्थानिक भाषेतील संवाद कौशल्य अत्यंत महत्त्वाचे ठरते. परीक्षेचे स्वरूप तीन टप्प्यांमध्ये विभागलेले आहे - पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा आणि मुलाखत. पूर्व परीक्षा ही सर्व शाखांसाठी एकसारखी असते आणि त्यामध्ये इतिहास, भूगोल, राज्यघटना, चालू घडामोडी, पर्यावरण, विज्ञान यासारख्या विषयांचा समावेश असतो. ही परीक्षा वस्तुनिष्ठ स्वरूपाची असून १०० गुणांची असते. यानंतर येते मुख्य परीक्षा, ज्यामध्ये दोन पेपर असतात. पहिला पेपर सामान्य अध्ययन आणि अभियंता घटक यावर आधारित असतो, तर दुसरा पेपर हा संबंधित शाखेच्या तांत्रिक विषयांवर आधारित असतो. उदाहरणार्थ, सिव्हिल अभियंता उमेदवारासाठी मुख्यतः स्ट्रक्चरल इंजिनियरिंग, ठउउ डिझाईन, ट्रान्सपोर्टेशन, जलसंपदा, पर्यावरणीय अभियांत्रिकी, भूगर्भशास्त्र, आणि मोजणी या विषयांवर प्रश्न विचारले जातात. शेवटचा टप्पा म्हणजे मुलाखत, ज्यामध्ये उमेदवाराच्या तांत्रिक ज्ञानासोबतच त्याची प्रशासकीय समज, समाजाभिमुखता आणि समस्या सोडवण्याची दृष्टिकोन तपासला जातो.

परीक्षेची तयारी करताना काही विशिष्ट अभ्यासपद्धती आणि स्रोतांचा अभ्यास करणे उपयुक्त ठरते. सर्वप्रथम, आयोगाच्या अधिकृत सूचना आणि अभ्यासक्रम काळजीपूर्वक वाचणे गरजेचे आहे. सामान्य अध्ययनाच्या तयारीसाठी NCERT चे ६ वी ते १२ वी पर्यंतचे पुस्तक, तसेच मराठी माध्यमातील लोकप्रशासन, आधुनिक भारताचा इतिहास, पर्यावरण शास्त्र यांची सखोल तयारी गरजेची आहे. चालू घडामोडींसाठी दैनिक वर्तमानपत्रांचे वाचन, मासिक अंकांचे परीक्षण आणि टेलिव्हिजनवरील विश्लेषणात्मक कार्यक्रमांची मदत होते. तांत्रिक विषयांच्या तयारीसाठी संबंधित शाखेतील ग्रंथांचा आणि पूर्व परीक्षांचे प्रश्नपत्रिकांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. तसेच टेस्ट सिरीज, ऑनलाइन मार्गदर्शन सत्रे, व अभ्यास गट तयार करून नियमित चर्चा करणे, हे यशाची शक्यता वाढवते. परीक्षा प्रक्रिया अवघड वाटली, तरी ती नियोजनपूर्वक पद्धतीने पार करता येते. दररोज ठराविक तासांचे नियोजन, आठवड्यातून एक दिवस फक्त पुनरावलोकनासाठी राखून ठेवणे, दर महिन्याला सराव चाचण्या घेणे, आणि वेळेचे योग्य नियोजन हे महत्त्वाचे ठरते. काही विषय कठीण वाटले तरी दिवसेंदिवस सातत्याने प्रयत्न करत राहिल्यास ते सोपे वाटू लागतात. मुलाखतीच्या तयारीसाठी ेलज्ञ ळपींर्शींळशुी आणि व्यक्तिमत्त्व विकास सत्रे उपयुक्त ठरतात. मुलाखतीमध्ये केवळ ज्ञानच नव्हे तर आपला दृष्टिकोन, संवाद कौशल्य, आणि उत्तरदायित्वाची जाणीव यांचा सखोल विचार होतो.

MPSC Engineering Services मधून निवड झाल्यावर उमेदवाराची नेमणूक शासनाच्या विविध विभागांमध्ये होते. कामाचे स्वरूप हे योजनांची अंमलबजावणी, निधी नियोजन, बांधकामांची गुणवत्ता तपासणी, कंत्राटदार व्यवस्थापन, लोकाभिप्रायाचे संकलन, आणि तांत्रिक अहवाल तयार करणे यावर आधारित असते. काही वेळा या अधिकाऱ्यांना आपापल्या क्षेत्रातील आपत्ती व्यवस्थापनामध्ये महत्त्वाची भूमिका निभवावी लागते. हे काम केवळ कार्यालयीन मर्यादेत न राहता, प्रत्यक्ष क्षेत्रात जाऊन लोकांशी संवाद साधून, त्यांचे प्रश्न सोडवून, आणि शासकीय योजनांचा फायदा शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचवण्याचे असते.

या सेवेमध्ये काम करताना आपल्याला केवळ अभियंता म्हणून नव्हे तर 'प्रशासक अभियंता' म्हणून वागावे लागते. शासनाच्या निधीचा योग्य वापर, जनतेच्या गरजा ओळखून निर्णय घेणे, वेळेत काम पूर्ण करणे आणि बांधकामांची गुणवत्ता राखणे ही जबाबदारी अत्यंत महत्त्वाची असते. त्यामुळेच, या सेवेतील उमेदवारांना केवळ ज्ञान नव्हे तर मूल्य, दृष्टिकोन आणि प्रामाणिकता यांची जोड आवश्यक असते.

अनेक यशस्वी उमेदवारांनी खाजगी क्षेत्रात उत्तम पगाराच्या नोकऱ्या करूनही MPSC Engineering Services कडे वळणे पसंत केले आहे. त्यांच्या मते, ही सेवा केवळ कारकीर्द घडवणारी नसून, ती एक सामाजिक बांधिलकीची पूर्तता आहे. विशेषतः ग्रामीण भागात काम करताना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते, परंतु त्यातून मिळणारे समाधान हे कोणत्याही बोनस किंवा पदोन्नतीपेक्षा मोठे असते. त्यामुळेच, ही सेवा केवळ करिअर नसून एक जीवनशैली आहे - अशी जी समाजासाठी झटते, बांधते, घडवते.

शेवटी, जर तुम्ही सिव्हिल, मेकॅनिकल किंवा इलेक्ट्रिकल अभियांत्रिकीचा विद्यार्थी असाल किंवा या शाखांमध्ये पदवी घेऊ इच्छित असाल तर आणि तुमच्यात समाजासाठी काम करण्याची तळमळ असेल, तर MPSC Engineering Services ही तुमच्यासाठी योग्य दिशा आहे. हा मार्ग सहज नाही, पण निश्चितच साध्य आहे - योग्य नियोजन, सातत्य, आणि दृढ इच्छाशक्ती असेल तर तुम्हीही या प्रशासकीय सेवेचा भाग बनू शकता. आजच्या विद्यार्थ्यांनी 'कोडिंग की कमिशन' या द्वंद्वात अडकून न राहता समाजासाठी निर्णय घेणारा अभियंता होण्याचा विचार करायला हवा. कारण वाटा प्रशासकीय सेवेच्या, या फक्त नोकरीच्या वाटा नाहीत, त्या भविष्य घडवण्याच्या आहेत.

अखिल भारतीय मराठा शिक्षण संस्थेचे अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड रिसर्च, पर्वती, पुणे ही केवळ एक अभियांत्रिकी संस्था नसून विद्यार्थ्यांमध्ये प्रशासकीय संवेदनशीलता रुजवणारी एक शैक्षणिक प्रयोगशाळा आहे. या संस्थेचे अनेक माजी विद्यार्थी आज PWD, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (MJP) यांसारख्या विविध सरकारी विभागांमध्ये अभियंता, उपअभियंता, प्रकल्प अभियंता म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या अनुभवातून सध्याच्या विद्यार्थ्यांना (Alumni interaction sessions) मध्ये प्रेरणा व मार्गदर्शन मिळते. MPSC Engineering Services आणि UPSC Civil Services साठी महाविद्यालयाचे ग्रंथालय आवश्यक संदर्भग्रंथ, NCERT पुस्तके, MPSC आणि UPSC सिरीजचे संच व विशेष साहित्य अध्ययनाकरिता उपलब्ध करून देत आहे. सोबतच टेक्निकल व नॉन-टेक्निकल विषयांवर आधारित PDF, व्हिडिओ लेक्चर्स, आणि टेस्ट सिरीज हे सर्व विद्यार्थ्यांना मागणीनुसार दिले जाते. अ. भा. वि. म. संस्थेमध्ये सुरू असलेल्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रामार्फत दरवर्षी मार्गदर्शन सत्रे, परीक्षांचे udates, तसेच तज्ज्ञांचे व्याख्यान घेतले जाते. अनेक प्राध्यापक स्वतः MPSC, GATE किंवा UPSC **ची** तयारी केलेले असल्यामुळे विद्यार्थ्यांना अनुभवाधारित सहकार्य लाभते. PWD, MJP, MIDC अशा शासकीय विभागांशी संलग्न इन-हाउस प्रोजेक्ट्स, internshi आणि field visits द्वारे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळतो, जो परीक्षेसह त्यांच्या भविष्यातील कारकिर्दीत उपयोगी ठरतो. अशा सर्व तयारीत अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च, पुणे हे तुमच्या प्रवासात एक प्रेरणास्थान, आधारस्तंभ आणि मार्गदर्शक म्हणून सदैव तयार आहे - म्हणूनच, अभ्यास करा, प्रश्न विचारा, आणि विश्वास ठेवा - कारण प्रशासकीय वाटा तुमच्यासाठीच खुल्या आहेत. तसेच सरकारी विभागांमध्ये काम करण्याचं स्वप्न बाळगणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांसाठी UPSC ही एक सर्वोच्च पायरी आहे - पुढील भागात जाणून घेऊया की अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड रिसर्च, पर्वती, पुणे परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी कोणत्या संधी, साधने आणि मार्गदर्शनाची शिस्तबद्ध मांडणी करते.

• प्रा. डॉ. सागर गावंडे
अनंतराव पवार कॉलेज ऑफ
इंजिनीयरिंग अँड रिसर्च,
पार्वती,पुणे

## संपादकीय

# मारकुटे राजकारणी !

राजकारणी मारकुटे झालेत, कुणाला काढावे, कुणाला झाकावे यातील भाग नाहीच असं जे खेदजनक वक्तव्य देवेंद्र फडणवीस यानीं केलं आहे, त्यात तथ्य आहे, विधिमंडळाच्या गॅलरीतच भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर व माजी मंत्री जितेंद्र आव्हाड यांच्या समर्थकांमध्ये हाणामारी झाल्यानंतर फडणवीस यांनी खेद व्यक्त केला होता. माज आला आहे, असेही ते म्हणाले होते, त्यात काहीच गैर नाही. त्याचा अनुभव आपणास सातत्याने येतच आहे. फडणवीस यांनी हे विधान करून अवघे ४८ तासही उलटले नाहीत तोच लातूरमध्ये छावा संघटनेचे पदाधिकारी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांना निवेदन देण्यासाठी गेल्यानंतर त्यांना राष्ट्रवादी युवकचे अध्यक्ष सुरज चव्हाण यांनी मारहाण केली. त्यातच ठाण्यात एकनाथ शिंदेंच्या शाखाप्रमुखाने तलवारी उपसल्या आहेत. त्यांनी तलवार हातात घेऊन धमकावत असल्याचा व्हिडिओ समोर आला. विचार करता राज्यात सत्ताधारी विरुद्ध विरोधक असा मुद्दाच राहिलेला नाही. केवळ एखाद्या पक्षापुरते हे मर्यादित नाही, तर सर्वच पक्षांमध्ये ही मानसिकता वाढत चालली आहे. गेल्या काही दिवसातील घटनाक्रम पाहिला तर राजकारण्यांमधील मारकुटेपणा आणि गुंडगिरी वाढली आहे. अनेक ठिकाणी स्थानिक राजकारणी, आमदार, किंवा त्यांचे कार्यकर्ते कायदा हातात घेत आहेत. त्यामुळे समाजात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रशासन आणि पोलीस यंत्रणांवर दबाव वाढत चालला असून काही राजकारणी अनेकदा पोलीस यंत्रणांवर दबाव आणतात, गुन्हेगारी प्रकरणांमध्ये हस्तक्षेप करतात, त्यामुळे हा सर्व प्रकार लोकशाहीसाठी घातक ठरत आहे. गेल्या काही दिवसापासून पहिले तर विधिमंडळातील कामकाजाचा दर्जा कमालीचा घसरलेला आहे. 'माजलेल्या आमदारां' मुळे सभागृहाची प्रतिष्ठा धुळीस मिळाली आहे. संसदीय आयुधांचा परिणामकारक वापर करून सर्वसामान्य जनतेच्या समस्यांना वाचा फोडण्याची, राज्याच्या वाटचालीला दिशा देणारे कायदे करण्याची जबाबदारी विसरून गुंडाचा आखाडा असे स्वरूप विधिमंडळाला प्राप्त झाले आहे. मंत्री, आमदारांना गंभीर चर्चा करण्यात स्वारस्य उरलेले नाही, एकमेकांचे हिशोब चुकते करण्याच्या कुरघोडीचे राजकारण सुरु आहे. त्यामुळेच राज्यातील चौदा कोटी जनतेला न्याय देण्यात लोकशाहीचा हा प्रमुख स्तंभ कुचकामी ठरत आहे. या जनभावनेला वाट देण्याचे काम कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी केले आहे. येथील रटाळ आणि नीरस चर्चेतून काय निष्पन्न होणार, असा भ्रमनिरास झाल्यामुळेच ते मोबाईलमध्ये डोके खुपसून या सर्व प्रकारचा निषेध नोंदवण्यासाठीच रमी खेळत असावेत. गेल्या १५ दिवसांतील घटनाक्रम पहिला तर एकीकडे विधिमंडळाचे अधिवेशन सुरु होते तर दुसरीकडे सभागृहाबाहेर राडा सुरु होता. पावसाळी अधिवेशन गाजले ते सभागृहाबाहेरील घटनेने. सत्तेत असलेल्या भाजप, एकनाथ शिंदे यांची शिवसेना, अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेतेमंडळीने मारहाणीचे वर्तुळ पूर्ण केले. शिंदेसेनेच्या शाखा प्रमुखानेच तलवारी उपसल्या. तलवार हातात घेऊन धमकावत असल्याचा व्हिडिओ आता समोर आला आहे. भिती राहिलेलीच नाही. पावसाळी अधिवेशन सुरु असतानाच मंत्रालयाच्या कँटिनमध्ये भातावरील वरण खराब निघाले म्हणून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे आमदार संजय गायकवाड यांनी कँटिनच्या कर्मचाऱ्याला मारहाण केली. त्यानंतर विधान भवनाच्या आवारातच जितेंद्र आव्हाड यांच्या सोबतच्या वादानंतर भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांच्या समर्थकांनी विधिमंडळ परिसरातील गॅलरीतच आव्हाडांच्या समर्थकाला मारहाण केली. विशेष म्हणजे यातील आरोपीवर मोक्काचे कलम आहे. जिथे राज्याच्या कायदा सुव्यवस्थेची धुरा सांभाळली जाते, आशा विधीमंडळाच्या परिसरातून याच आरोपीने कायदा सुव्यवस्थेची धिंड काढली. अधिवेशन सुरळीत पार पडले त्यानंतर काही होणार नाही असे वाटत होते. मात्र, हा त्रिकोण पूर्ण करण्याची जबाबदारी सत्तेतील अजित पवार यांच्या गटाने अधिवेशनानंतर पार पाडली. लातूरमध्ये छावा संघटनेच्या पदाधिकाऱ्यानी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यासमोर पत्ते फेकून निषेध केला म्हणून अजित पवारांच्या राष्ट्रवादी युवकचे प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण यांनी छावा संघटनेच्या आंदोलकांना जबर मारहाण केली. लातूरमधील या घटनेनंतर सत्तेतील तीन ही मित्र पक्षांच्या नेत्याच्या मारहाणीचा वर्तुळ पूर्ण झाले आहे. या सर्व प्रकारामुळे सत्ताधारी महायुतीमधील नेत्यांविषयी नाराजी निर्माण होणे साहजीकच आहे. अशा लोकप्रतिनिधींना आपण निवडून देतो, ही चूक कुणाची नेत्यांची की निवडून देणाऱ्या मतदारांची.

# लव्हलोकलचे 'क्वालिटी कॉमर्स'ला प्रोत्साहन

**मुंबई : हॅलो प्रभात**

भारतातील ऑनलाइन किराणा बाजारपेठ वेगाने बदलत असताना मुंबईस्थित हायपरलोकल ई-कॉमर्स ॲप लव्हलोकल अद्वितीय 'क्वालिटी कॉमर्स' मॉडेलसह क्विक कॉमर्सला एक शक्तिशाली पर्याय म्हणून पुढे येत आहे. हे मॉडेल केवळ जलद वितरणावरच लक्ष केंद्रित करत नाही तर गुणवत्ता, विश्वास आणि स्थानिक दुकानदारांना सक्षम बनविण्यावर देखील लक्ष केंद्रित करते. लव्हलोकलचे हायपरलोकल ॲप ग्राहकांना सोयीस्कर आणि विश्वासाला प्राधान्य देणारा अनुभव देण्यासाठी डिझाइन केलेले आहे. बदलत्या ग्राहक ट्रेंडनुसार लव्हलोकल 'क्वालिटी कॉमर्स'ला प्रोत्साहन देत असून फळे, भाज्या, मांस, मासे आणि निवडक किराणा उत्पादनांचा ताजेपणा आणि गुणवत्तेच्या खऱ्या चिंता दूर करत आहे. स्थानीय स्टोअर्ससोबत भागीदारी केल्याने सर्व ऑर्डरवर मोफत डिलिव्हरी आणि मोफत बदलीची खात्री येथे मिळते.

# अदानी विद्यापीठात भविष्य-केंद्रित नव्या विद्यार्थ्यांचे स्वागत

**अहमदाबाद : हॅलो प्रभात**



अदानी विद्यापीठाने सोमवार, २१ जुलै २०२५ रोजी आपल्या शैक्षणिक दीक्षारंभ कार्यक्रम 'नवदीक्षा २०२५''चे उद्घाटन केले. या कार्यक्रमात बी.टेक + एमबीए / एमटेक या प्रमुख एकत्रित अभ्यासक्रमांमध्ये नवीन विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. प्रेरणादायी भाषणे आणि दूरदृष्टीपूर्ण विचारांनी सजलेल्या या कार्यक्रमात, कृत्रिम बुद्धिमत्ता(एआय), शाश्वतता आणि राष्ट्रनिर्मितीच्या आधारे घडणाऱ्या नव्या औद्योगिक युगासाठी भारतीय तरुणांना तयार करण्याचे विद्यापीठाचे ध्येय स्पष्ट झाले. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या मार्गदर्शक तत्वांनुसार तयार करण्यात आलेले हे एकत्रित अभ्यासक्रम, सखोल वैज्ञानिक दृष्टिकोन, बहुविषयक शिक्षण आणि तंत्रज्ञान, ऊर्जा व पायाभूत सुविधांमध्ये नेतृत्व निर्माण करण्याचा उद्देश ठेवतात. या उद्घाटन समारंभात, जगप्रसिद्ध व्यवस्थापन सल्लागार आणि हार्वर्ड विद्यापीठाचे माजी विद्यार्थी डॉ. राम चरण आणि अदानी ग्रुपचे चीफ ट्रान्सफॉर्मेशन ऑफिसर सुदीप्त भट्टाचार्य सहभागी झाले होते.

# फेडएक्सचा मॅजिक बस इंडिया फाउंडेशनसह सहयोग

**मुंबई : हॅलो प्रभात**

शिक्षण आणि कौशल्य विकास क्षेत्रातील आघाडीची ना-नफा संस्था मॅजिक बस इंडिया फाउंडेशनने जगातील सर्वात मोठी एक्सप्रेस वाहतूक कंपनी फेडएक्स एक्सप्रेस (फेडएक्स) सोबत सहयोगाने सायबर सेफ इंडिया कॅम्पेन सुरू केली आहे. या देशव्यापी उपक्रमाचा तरुणांना आणि समुदायांना डिजिटल जगात सुरक्षितपणे व जबाबदारीने नेव्हिगेट करण्यासाठी ज्ञानासह सुसज्ज करून सायबर गुन्ह्यांना रोखण्याचा मनसुबा आहे. हा उपक्रम डिजिटल जागरूकता वाढवण्यासाठी आणि विशेषतः आव्हानात्मक पार्श्वभूमी असलेल्या समुदायांना विश्वसनीय साधने व प्लॅटफफॉर्मचा वापर करण्यास प्रेरित करण्यासाठी डिझाइन करण्यात आला आहे. १३ राज्ये आणि २९ शहरांमध्ये हा उपक्रम सुरू होत आहे. मॅजिक बसची १३० हून अधिक उपजीविका केंद्रे व १००० हून अधिक महाविद्यालयांच्या विद्यमान नेटवर्कचा वापर करून हा उपक्रम दोन लाखांहून अधिक व्यक्तींपर्यंत पोहोचेल आणि जास्तीत-जास्त प्रभाव पाडेल.

# 'शांती गोल्ड'चा सार्वजनिक प्रस्ताव २५ जुलै रोजी उघडणार

**किंमत पट्टा १८९ रु. ते १९९ रु. प्रति इक्विटी शेअर असा निश्चित**

**मुंबई : हॅलो प्रभात**



शांती गोल्ड इंटरनॅशनल लिमिटेडने त्यांच्या पहिल्या प्रारंभिक सार्वजनिक प्रस्तावासाठी प्रत्येकी १० रु. दर्शनी मूल्याच्या इक्विटी शेअरसाठी १८९ रु. ते १९९ रु. असा किंमतपट्टा निश्चित केला आहे. कंपनीचा प्रारंभिक सार्वजनिक प्रस्ताव (आयपीओ किंवा ऑफर) शुक्रवार, २५ जुलै २०२५ रोजी सबस्क्रिप्शनसाठी उघडेल आणि मंगळवार, २९ जुलै २०२५ रोजी बंद होईल. गुंतवणूकदार किमान ७५ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर ७५ इक्विटी शेअर्सच्या पटीत बोली लावू शकतात. हा आयपीओ पूर्णपणे १८,०९६,००० इक्विटी शेअर्सपर्यंतच्या शेअर्सचा एक नवीन इश्यू आहे ज्यामध्ये विक्रीसाठी कोणताही प्रस्ताव नाही.

शांती गोल्ड इंटरनॅशनलची स्थापना २००३ मध्ये एका भागीदारी फर्म म्हणून झाली. प्रवर्तक पंकजकुमार एच. जगवत आणि मनोजकुमार एन. जैन यांनी ही कंपनी उच्च दर्जाच्या २२ कॅरेट सीझेड कास्टिंग सोन्याच्या दागिन्यांचा एक आघाडीचा उत्पादक आहे, जो स्थापित उत्पादन क्षमतेच्या बाबतीत सर्व प्रकारच्या सोन्याच्या दागिन्यांच्या डिझाइन आणि उत्पादनात विशेषज्ञ आहे

ज्यामध्ये बांगड्या, अंगठ्या, नेकलेस आणि लग्नासारख्या विशेष प्रसंगी, उत्सव आणि दैनंदिन वापरासाठी

वापरल्या जाणाऱ्या दागिन्यांपर्यंत विविध किंमतींमध्ये पूर्ण दागिन्यांचा संच समाविष्ट आहे.

# 'लक्ष्मी इंडिया फायनान्स' चा प्रारंभिक सार्वजनिक प्रस्ताव २९ जुलै २०२५ रोजी उघडणार

**किंमतपट्टा १५० रु.ते १५८ रु. प्रति इक्विटी शेअर निश्चित**

**मुंबई : हॅलो प्रभात**

लक्ष्मी इंडिया फायनान्स लिमिटेडने त्यांच्या पहिल्या प्रारंभिक सार्वजनिक प्रस्तावासाठी प्रत्येकी ५ रु. दर्शनी मूल्याच्या इक्विटी शेअरसाठी १५० रु. ते १५८ रु. असा किंमतपट्टा निश्चित केला आहे. कंपनीचा प्रारंभिक सार्वजनिक प्रस्ताव (आयपीओ किंवा ऑफर) मंगळवार, २९ जुलै २०२५ रोजी सबस्क्रिप्शनसाठी उघडेल आणि गुरुवार, ३१ जुलै २०२५ रोजी बंद होईल. गुंतवणूकदार किमान ९४इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर ९४ इक्विटी शेअर्सच्या पटीत बोली लावू शकतात. या आयपीओमध्ये १८,४५३,५७५ पर्यंतच्या नवीन शेअर्सची विक्री आणि प्रमोटर आणि प्रमोटर ग्रुप सेलिंग शेअरहोल्डर्सकडून ५,६३८,६२० पर्यंतच्या इक्विटी शेअर्सची विक्रीची ऑफर यांचा समावेश आहे. लक्ष्मी इंडिया फायनान्सची स्थापना १९९० च्या दशकाच्या सुरुवातीला दीपक फायनान्स अँड लीजिंग कंपनीसोबत सुरू झालेल्या वारशावर झाली. ही एक नॉन-डिपॉझिट टेकिंग नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनी आहे जी भारतातील कर्ज बाजारपेठेतील वंचित ग्राहकांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यावर लक्ष केंद्रित करते. कंपनी तिच्या ग्राहकांच्या विशिष्ट गरजा पूर्ण करण्यासाठी विविध प्रकारच्या कर्ज उत्पादनांची ऑफर देते. तिच्या व्यवसायात एमएसएमई फायनान्स, व्हेईकल फायनान्स, कन्स्ट्रक्शन लोन्स आणि इतर समाविष्ट आहेत. रिटेल ग्राहकांना त्यांच्या कार्यरत भांडवलाच्या गरजा आणि वैयक्तिक वापरासाठी अनुक्रमे लघु-तिकिट असुरक्षित व्यवसाय आणि वैयक्तिक कर्जे आणि इतर एनबीएफसींना घाऊक कर्जे देखील देते.

नवे विचार...नवी सुरुवात
दैनिक हॅलो प्रभात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली - ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक हॅलो प्रभात**, कार्यालय, ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली- ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले.
■ **सांगली मुख्य कार्यालय** : ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली. ■ **पुणे कार्यालय** : १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे-४११०३०
■ **सांगली शहर संपर्क : ९०२१६५१९७६** ■ **कोल्हापूर कार्यालय** : एस ९४६, GF-७, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६००२
■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)
■ व्यवस्थापकीय संपादक : संजय भिडे ■ सल्लागार संपादक : संजीव शाळगावकर ■ मुख्य संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर

# कर्ज माफीसह इतर मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन

**सुरेशराव लांबे पाटील**

**राहुरी : हॅलो प्रभात**

गेली सहा महिन्यापासून शेतकऱ्याचे व दिव्यांगांचे कैवारी मा.मंत्री.बच्चुभाऊ कडू यांनी शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी,दिव्यांगांना सहा हजार मानधन व इतर मागण्यांसाठी विविध प्रकारचे आंदोलने केली परंतु गेंड्याच्या काताडीचे हे झोपेचे सोंग घेतलेले महायुती सरकारला जाग येण्यासाठी बच्चु भाऊंच्या मार्गदर्शनाखाली नगर मनमाड रोड राहुरी मार्केट कमिटी समोर चक्काजाम रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. सरकारने या मागण्या त्वरित मान्य कराव्यात अन्यथा आणखी तीव्र आंदोलन करण्यात येईल असे प्रहारचे राहुरी तालुका अध्यक्ष शेतकरी नेते सुरेशराव लांबे पाटील यांनी सांगितले.पुढे बोलताना लांबे पाटील यांनी डिझेल,पेट्रोल, रासायनिक खते,कृषी औषधे,पशुखाद्य यांच्या किंमती गगनाला भिडल्या असून त्या तुलनेत शेतीमालाला व जोडधंदा असलेल्या दुधाला भाव मिळत नसल्यामुळे शेतकरी



आत्महत्या करत आहे. यात सुधारणा होण्यासाठी .बच्चुभाऊ कडू यांनी मोझरी येथे सात दिवस अन्नत्याग उपोषण केले अमरावती ते यवतमाळ १४० किलोमीटर सातबारा कोरा पायी दिंडी,शेतकऱ्यांचा सात बारा उतारा कोरा.पेरणी ते कापणी खर्च एम.आर.इ.जी. एस. अंतर्गत,शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव,दिव्यांगांना सहा हजार पेन्शन,दिव्यांगाला घरकुलचा लाभ,यासह इतरही मागण्यांसाठी राहुरी येथे सर्वपक्षीय आंदोलन केले. यावेळी प्रहार दिव्यांग क्रांती सेनेचे जिल्हा अध्यक्ष मधुकर घाडगे, जिल्हा उपाध्यक्ष अप्पासाहेब ढुस, स्वाभिमानीचे जिल्हा अध्यक्ष रविंद्र मोरे,प्रकाश देढे, रासप चे जिल्हा अध्यक्ष नानासाहेब जुंधारे, आरपीआयचे सचिन भाऊ साळवे,सावता परिषदेचे अशोक तुपे , यांची भाषणे झाली यावेळी सलिमभाई शेख, योगेश लबडे, वेनुनाथ आहेर, सचिन साळवे, जुबेर मुसानी, किशोर जाधव सर, संजय देवरे, दत्तात्रय खेमनर , दत्तात्रय येवले , अनिल पेरणे, काशिनाथ दोंड, रायभान धसाळ, शिवाजी झावरे,सरपंच अंतवन गायकवाड, केशव जाधव, कडू शोभा, सोनाली खडके, दावजी भोसले, नानासाहेब खपके, भारत आढाव, कमलेश परदेशी , जलुभाऊ भोसले , रवींद्र भुजाडी, रवींद्र तनपुरे, राजेंद्र घनवट, उपस्थित होते.

# रक्तगट तपासणी काळाची गरज : सुभाष लव्हटे



**पन्हाळा : हॅलो प्रभात**

आजच्या धावपळीच्या जगामध्ये रक्ताची गरज केव्हा कधी व कुणाला भासेल हे सांगता येणार नाही. त्यामुळे ऐनवेळी होणारी धावपळ टाळण्यासाठी स्वतःचा रक्तगट माहिती असणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन योगी प्रभुनाथ महाराज माध्यमिक विद्यालय वाघवे येथे आयोजित केलेल्या रक्तगट तपासणी शिबिरामध्ये केले.यावेळी संस्थेचे अध्यक्ष जी.एस. विभूते,उपाध्यक्ष के. पी. इंगवले, खजनिस् जे के चौगले, संचालक एस व्ही गायकवाड कर्तव्यदक्ष व उपक्रमशील मुख्याध्यापक पी.एस. पाटील,एस. एस.लव्हटे डी.जी.सुतार ,एस. एस. गायकवाड सह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

# के.बी.रोहमारे महाविद्यालयात आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

**कोपरगांव : हॅलो प्रभात**

के. बी. रोहमारे कनिष्ठ महाविद्यालय, कोपरगाव येथे सर्व विद्यार्थी, प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. याप्रसंगी कोपरगाव ग्रामीण रुग्णालय येथील डॉ. पालवे, आरोग्य निरीक्षक श्री. एस. ए. जोशी हे मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय ठाणगे होते. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. बाळासाहेब सोनवणे, प्रा. संदीप जगझाप, प्रा . दीपक बुधवंत, प्रा. मिलिंद कांबळे, प्रा. अभिजित वाघ आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. जगझाप यांनी केले. यावेळी



विद्यार्थ्यांशी हितगुज करताना डॉ. पालवे यांनी आरोग्य तपासणीचे महत्त्व सांगितले. आरोग्य निरीक्षक जोशी यांनी डेंग्यू, हिवताप, मलेरिया आणि तत्सम आजारांबाबत सखोल मार्गदर्शन केले. हे आजार पसरण्याचे कारणे, डासांचे वाढते प्रमाण, त्यामुळे आरोग्यावर होणारे परिणाम हे ही त्यांनी सांगितले. हे आजार होऊ नये म्हणून काय उपाययोजना करावी, डासांचे वाढते प्रमाण कसे रोखावे, कोरडा दिवस कसा पाळावा याबाबत त्यांनी महत्त्वाच्या सूचना दिल्या.यावेळी सर्व विद्यार्थी, प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांची उंची, वजन, हिमोग्लोबिन पातळी व रक्तदाब यांची तपासणी करण्यात आली. उपस्थितांचे आभार प्रा. दीपक बुधवंत यांनी मानले तर सूत्रसंचालन प्रा. जावेद शाह यांनी केले. शिबिर यशस्वी होण्यासाठी प्रा. मयुरी भोसले, प्रा.सायली वायखिंडे, प्रा.अमोल वर्पे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# शिक्षकांच्या कार्यमुक्तीचे आदेश मे २०२६ नंतर द्यावेत : क्रांतीसेनेची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**राहुरी : दिनेश गायकवाड**

जिल्हा परिषद शाळांतील शिक्षकांच्या झालेल्या बदल्या रद्द न करता, कार्यमुक्तीचे आदेश थेट मे २०२६ नंतर द्यावेत, अशी मागणी अखिल भारतीय क्रांतीसेना पक्षाचे प्रदेश संपर्क प्रमुख मधुकर म्हसे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.या निवेदनात म्हटले आहे की, अहिल्यानगर जिल्हा परिषद क्षेत्रातील प्राथमिक शिक्षकांच्या बदल्यांचे आदेश जुलै २०२५ मध्ये अंमलात आणले गेले. मात्र, शैक्षणिक वर्षाचा मोठा भाग पार होत असताना अचानक झालेल्या या बदल्यांमुळे विद्यार्थ्यांवर मानसिक ताण येतो, अभ्यासक्रमात अडथळे निर्माण होतात आणि शैक्षणिक गुणवत्ता घसरते, असा गंभीर परिणाम होत आहे. इ. १ ली ते ४ थी पर्यंतच्या विद्यार्थ्यांमध्ये शिक्षकांप्रती भावनिक नाते निर्माण झालेले असते.

अशा वेळी शिक्षक बदल्यांमुळे त्या नात्यांमध्ये व्यत्यय येतो, ज्याचा खोल परिणाम त्यांच्या मनोविश्वावर होतो, असे म्हसे पाटील यांनी स्पष्ट केले. बदल्यांचे आदेश योग्य असले तरीही त्यांची अंमलबजावणी मे २०२६ नंतर केल्यास विद्यार्थी व शिक्षक या दोघांच्याही दृष्टीने हितकारक ठरेल, असे त्यांनी अधोरेखित केले.

या मागणीला अनेक पालकांनीही पाठिंबा दिला असून, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक सत्र अखंडित राहावे व त्यांचा सर्वांगीण विकास साधावा, यासाठी शासनाने सदर प्रस्ताव गांभीर्याने विचारात घ्यावा, अशी अपेक्षा क्रांतीसेना पक्षाने व्यक्त केली आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी या निवेदनाची सकारात्मक दखल घ्यावी आणि लवकरच यावर निर्णय जाहीर करावा, अशी मागणी अखिल भारतीय क्रांतीसेना पक्षाने केली आहे.

# विकासाच्या नावाखाली स्थानिक नागरिकांची असुरक्षितता



## आ.अरुण लाड; गैरसोय होऊ देणार नाही

**कुंडल : हॅलो प्रभात**

किलोस्करवाडी येथील आंदोलनास पाठिंबा भेट किर्लोस्करवाडी येथे सुरू असलेल्या उड्डाणपूल आणि भुयारी पुलाच्या कामांमध्ये अनेक तांत्रिक त्रुटी व नियोजनातील कमतरता असल्याच्या तक्रारी वारंवार समोर येत आहेत. याच पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते अख्तर पिरजादे यांनी मागील २२ दिवस ठिय्या आंदोलन करून सुरू असलेल्या नवीन उड्डाण पूल, भुयारी पूल, पादचारी पूल अशा कामांचा विरोध केला असून आमदार अरुण लाड यांनी आंदोलनस्थळी जाऊन पिरजादे यांची भेट घेतली. त्यांच्या सर्व मागण्या, समस्या आणि विविध मुद्द्यांविषयी सविस्तर चर्चा करून त्यांना पाठिंबा दर्शविला. कामाच्या दर्जावर, स्थानिक नागरिकांच्या गैरसोयीवर तसेच सुरक्षिततेच्यादृष्टीने निर्माण होणाऱ्या प्रश्नांची सोडवणूक होणे गरजेचे आहे. विकासाच्या नावाखाली कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार करून सामान्य लोकांना त्रासदायक व जीवितास धोकादायक असणारा हा उड्डाण पूल आणि भुयारी मार्ग चुकीचा असल्याची माहिती रेल्वे प्रशासनाला देण्यासाठी तात्काळ बैठकीची मागणी करण्याचे आश्वासन आमदार अरुण लाड यांच्याकडून देण्यात आले.यावेळी परिसरातील कुंडल गावचे सरपंच जयराज होवाळ, उपसरपंच किरण लाड, श्रीकांत लाड, विजय लाड, ग्रामपंचायत सदस्य राहुल पवार तसेच इतर मान्यवर व नागरिक उपस्थित होते.

# रयत शिक्षण संस्थेच्या लाईफ वर्करपदी सुनिता वाबळे

**कोपरगाव : हॅलो प्रभात**

दि.रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँक सातारा च्या माजी व्हाईस चेअरमन सुनिता सुरेश वाबळे यांची लाईफ वर्कर पदी निवड करण्यात आली आहे.नुकत्याच मॅनेजिंग कौन्सिलच्या मीटिंगमध्ये ही निवड करण्यात आली. सुनीता वाबळे यांची दि.रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँकेच्या महिला प्रतिनिधी म्हणून सन २०१५ मध्ये प्रथमच संचालकांच्या बिनविरोध निवडी करण्यात आली होती.रयत बँकेत त्यांनी ७ वर्षे संचालक उत्तम कामगिरी केल्यामुळेत्यांच्या कामाची दखल घेऊन रयत शिक्षण संस्थेने नुकतीच त्यांची लाईफ वर्करपदी निवड केली. सुनिता वाबळे यांचे पती कर्मवीर भाऊराव पाटील माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ कला,विज्ञान महाविद्यालय विंचूर येथे उपप्राचार्य म्हणून काम करीत आहे. सुनीता वाबळे यांना रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी सदस्या सरोजमाई एन.डी. पाटील व मॅनेजिंग कौन्सिल सदस्या मीनाताई जगधने यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. त्यांच्या या निवडीबद्दल संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी , व्हाईस चेअरमन भगीरथजी शिंदे, सचिव विकास देशमुख, उच्च माध्यमिक सहसचिव शिवलिंग मेनकुदळे, बंडू पवार, राजेंद्र मोरे,सरोजमाई पाटील, मीनाताई जगधने, आमदार आशुतोष काळे , बिपिन कोल्हे, आमदार स्नेहलता कोल्हे, आदींनी अभिनंदन केले. प्रारंभी सुनीता वाबळे यांचा सी एम मेहता कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अनिता धनक व त्यांचे सहकारी यांच्या हस्ते विद्यालयात सत्कार करण्यात आला.



# संजीवनी स्कूलची कलात्मक जिमनॅस्टिक स्पर्धेत पदकांची कमाई

**कोपरगांव : विनोद जवरे**

अहिल्यानगर जिल्हा जिमनॅस्टिक असोसिएशनच्या वतीने कोपरगांव येथे घेण्यात आलेल्या जिल्हा स्तरीय कलात्मक जिमनॅस्टिक स्पर्धेत संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स संचलित शिर्डी येथिल संजीवनी इंटरनॅशनल स्कूलच्या जिमनॅस्टिक पटूंनी आपले शारीरिक कौशल्य दाखवुन वेगवेगळ्या वयोगटात सुवर्ण, रौप्य व कास्य पदकांची कमाई करून या क्रीडा प्रकारातही अव्वल असल्याचे सिध्द केले. आता सुवर्ण पदक विजेते खेळाडू अहिल्यानगर जिल्ह्याचे नतृत्व करणार आहे, अशी माहिती स्कूलने प्रसिध्दी पत्रकाद्वारे देण्यात आली आहे.या स्पर्धेत मुलांच्या आठ वर्षांखालील वयोगटात राजवीर अभिजीत कोते याने सुवर्ण पदक मिळविले तर मुलींच्या गटात रीत आनंद भंडारी हिने सुवर्ण,




सनाया समिर पाटील हीने रौप्य व पीहू प्रितेश पिपाडा हिने कांस्य पदक मिळविले. दहा वर्षाखालील मुलींच्या गटात मीरा विलास कोतकर हीने सुवर्ण व आराध्या अच्युत कातोरे हीने रौप्य पदक मिळविले. चौदा वर्षांखालील मुलींच्या गटात गटात अर्पिता अतुल गोंदकर हीने सुवर्ण, तपस्या सागर लांडगे व राजनंदिनी स्वप्निल भोसले यांनी रौप्य पदकांची कमाई केली. याच गटात मनस्वी पंकज पाटील व तनिष्का प्रवीण रोकडे यानी कांस्य पदकांची कमाई केली. सतरा वर्षांखालील गटात मेरिष्का सिध्दार्थ सबलोक हीने सुवर्ण पदकाची कमाई केली.कलात्मक जिमनॅस्टिक हा खेळ क्रीडा प्रकारातील एक अत्यंत आकर्षक आणि शारीरिक कौशल्य दाखवणारा प्रकार आहे. खेळाडू या खेळात त्यांच्या शरीराच्या लवचिकतेसह, शारीरिक क्षमता आणि कलात्मक सर्जशीलता दाखवितात. सन १८९६ मध्ये या क्रीडा प्रकाराचा समावेश ऑलिंपीकच्या अधिकृत क्रीडा प्रकारांमध्ये करण्यात आला. संजीवनी इंटरनॅशल स्कूलमध्ये शैक्षणिक गुणत्तेसह प्रत्येक क्रीडा प्रकाराचे प्रशिक्षण दिल्या जाते. प्रत्येक स्पर्धेत विद्यार्थी भाग घेवुन बक्षिसे जिंकुण येतात, हे या स्कूलच्या बाबतीत समिकरण बनले आहे. संजीवनीचे अध्यक्ष श्री नितीनदादा कोल्हे व मॅनेजिंग ट्रस्टी श्री अमित कोल्हे यांनी सर्व पदके प्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून सुवर्ण पदक विजेत्यांना राज्य स्तरीय स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या. स्कूलच्या संचालिका डॉ. मनाली कोल्हे यांनी सर्व विजयी खेळाडूंचा सत्कार केला. यावेळी स्कूलच्या प्राचार्या रिना रजपुत, हेड मिस्ट्रेस रेखा साळुंके, क्रीडा प्रशिक्षक विरूपक्ष रेड्डी व आकांक्षा पाखले उपस्थित होते.

# श्री लोटस डेव्हलपर्स चा प्रारंभिक सार्वजनिक ऑफर ३० जुलै ला उघडणार




**मुंबई : हॅलो प्रभात**

श्री लोटस डेव्हलपर्स अँड रिॲल्टी लिमिटेडने त्यांच्या पहिल्या प्रारंभिक सार्वजनिक ऑफरसाठी प्रत्येकी १ रु. दर्शनी मूल्याच्या इक्विटी शेअरसाठी १४० रु. ते १५० रु. असा किंमतपट्टा निश्चित केला आहे. कंपनीचा प्रारंभिक सार्वजनिक ऑफर (आयपीओ किंवा ऑफर) बुधवार, ३० जुलै २०२५ रोजी सबस्क्रिप्शनसाठी उघडेल आणि शुक्रवार, १ ऑगस्ट २०२५ रोजी बंद होईल. गुंतवणूकदार किमान १०० इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर १०० इक्विटी शेअर्सच्या पटीत बोली लावू शकतात. कर्मचारी आरक्षण भागात बोली लावणाऱ्या पात्र कर्मचाऱ्यांना प्रति इक्विटी शेअर्स १४ रु. प्रति इक्विटी शेअरची सवलत दिली जात आहे.

हा आयपीओ पूर्णपणे ७९२ कोटी रुपयांपर्यंतच्या शेअर्सचा एक नवीन इश्यू आहे, ज्यामध्ये विक्रीसाठी कोणताही प्रस्ताव नाही.श्री लोटस डेव्हलपर्स अँड रिअल्टी ही मुंबई, महाराष्ट्रातील निवासी आणि व्यावसायिक परिसरांची विकासक आहे, ज्याचे लक्ष पश्चिम उपनगरातील अल्ट्रा लक्झरी सेगमेंट आणि लक्झरी सेगमेंटमध्ये पुनर्विकास प्रकल्पांवर 'लोटस डेव्हलपर्स' ब्रँड अंतर्गत आहे.कंपनीचे प्रकल्प खालील तीन (३) श्रेणींमध्ये विभागले जाऊ शकतात, ग्रीनफील्ड प्रोजेक्ट्स, पुनर्विकास प्रकल्प, संयुक्त विकास प्रकल्प.कंपनीने ३० जून २०२५ पर्यंत निवासी आणि व्यावसायिक अशा दोन्ही मालमत्तांचा समावेश असलेले ०.९३ दशलक्ष चौरस फूट विकासयोग्य क्षेत्र पूर्ण केले आहे.

# कोलवडी-मांजरी रस्त्याचे रुंदीकरणासह नूतनीकरण करावे

**सरपंच विनायक गायकवाड**

**दौंड : हरिभाऊ बळी**

ग्रामीण भागापासून शहरी भागाला जोडणारा महत्वपूर्ण दळणवळण व वर्दळीचा रस्ता मार्ग म्हणून कोलवडी-मांजरी खुर्द-हडपसर रस्त्याला महत्व प्राप्त झाले आहे. कोलवडी-साष्टे मार्गे मांजरी खुर्द,मांजरी बुद्रुक पुढे हडपसर शहराकडे हा रस्ता जातो.परंतु सद्यस्थितीत या रस्त्याची ठिकठिकाणी पडलेल्या खड्यांमुळे अतिशय दुरवस्था झाली आहे.तसेच हा रस्ता पूर्वीपासून पूर्णपणे अरुंद असल्याने येथे दोन चारचाकी वाहने बसने अवघड होत असल्याने येथे अतिशय अरुंद व दुरवस्थेतील रस्त्यांमुळे या मार्गावर दररोज अपघत घडत आहे.त्यामुळे अपघातांचे प्रमाण अधिक वाढले असून अनेकांना या रस्त्यावर आपले जीव गमवावे लागले आहेत. कोलवडी गाव महानगर पालिकेच्या शेजारी असून मोठी लोकसंख्या झापाट्याने वाढली आहे.त्यामुळे शासनाने,संबंधित बांधकाम खात्याने कोलवडी-मांजरी वर्दळीच्या रस्त्याचे रुंदीकरणासह नूतनीकरण त्वरित करण्याची मागणी कोलवडी गावचे लोकनियुक्त सरपंच विनायक गायकवाड यांनी शासन स्तरावरील सबंधित खाते व बांधकाम विभागाकडे वेळोवेळी केली आहे. या रस्त्यावर ग्रामीण भागाकडून शहरी भागाकडे जाणारी प्रवासी



वाहने ही बंद असून रस्त्यात पीएमपीएल बसला या रस्त्यावर चालताना अडथळा येत असल्याने बससेवाही बंद अवस्थेत असल्याने प्रवासी व शाळकरी मुलांची गैरसोय होत आहे.त्यामुळे या रस्त्याकडे लवकरात लवकर संबंधित रस्ते बांधकाम खात्याने लक्ष घालून योग्य तो मार्ग काढणे गरजेचे असल्याचे कोलवडी व मांजरी ग्रामस्थ यांच्यामध्ये चर्चा रंगत आहे. या मार्गाने अष्टविनायक असलेल्या थेऊर चिंतामणी धार्मिक स्थळाकडे जाणारे भाविक भक्त, प्रवास करणारे नागरिक,वाहन चालक अक्षरशःहा वैतागले असून जीव मुठीत घेऊन या रस्त्यावरून प्रवास करीत आहे.त्यामुळे कोलवडी-मांजरी रस्त्याचे रुंदीकरण व नूतनीकरण त्वरित व्हावेत यासाठी कोलवडी मांजरी खुर्द या दोन्ही गावातील ग्रामस्थ आक्रमक झालेले आहेत.

कोलवडी-मांजरी रस्त्याच्या रुंदीकरण व नूतनीकरण त्यावर बजेट टाकले होते,मागे या रस्त्याची मोजणी करून सर्व्हे केला होता.त्यानंतर रुंदीकरण करण्यासाठी हा विषय भूमी अभिलेख ला टाकले आहे.बरेच वर्ष झाले या रस्त्याचे डांबरीकरनाचे काम रखडले आहे ते पूर्ण करण्याचा व रस्त्याचे रुंदीकरण करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

**-अश्विनी तांदळे,सबंधित अधिकारी**

### कोलवडीकरांचा आंदोलनाचा इशारा

दळणवळण व वर्दळीच्या दृष्टीने कोलवडी-मांजरी रस्ता मार्ग आता महत्त्वपूर्ण झाला असून त्यामुळे अनेक वर्षापासून या रस्त्याचे रुंदीकरण व नूतनीकरण होण्याचे काम रखडले आहे.जर यापुढे शासनाने किंवा सबंधित खात्याच्या अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष दिले नाही तर रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा इशारा दिला असल्याचे सरपंच गायकवाड यांनी दिला.

# घरकुलांसाठी निधी द्या : भगवानदास केंगार




**जत : हॅलो प्रभात**

तालुक्यातील हजारो कुटुंबांचे घराचे स्वप्न रखडल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी आहे. जिल्हा परिषदेमार्फत राबविल्या जाणाऱ्या रमाई आवास, वसंत घरकुल, यशवंतराव चव्हाण अहिल्यादेवी होळकर आणि २० टक्के निधीच्या घरकुल योजनांचे प्रस्ताव नव्याने मंजूर करून तातडीने निधी वितरित करण्याची मागणी सरपंच सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष भगवानदास केंगार यांनी केली. यासंदर्भात केंगार यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे यांची भेट घेऊन पंतप्रधान आवास योजनेंतर्गतही घरकुले मंजूर करण्याची मागणी केली.

# जलजीवनचे पैसे थकल्याने तरुण कंत्राटदाराची आत्महत्या

**सांगली : हॅलो प्रभात**

जलजीवन मिशनचे काम करणाऱ्या सरकारी कंत्राटदराने आत्महत्या केल्याने एकच खळबळ उडाली आहे. हर्षल पाटील असं त्यांचं नाव असून राज्य सरकारकडून वेळेत बिलं मिळत नसल्याने नैराश्यातून टोकाचे पाऊल उचलले असल्याचा आरोप प्रयत्न सरकारी कंत्राटदारांच्या संघटनेकडून करण्यात आला आहे. हर्षल पाटील वाळवा तालुक्यातील तांदुळवाडी गावचे आहेत. राज्य सरकारकडून केलेल्या कामाचा मोबदलाच वेळेत मिळाला नसल्यानेच त्रासाला कंटाळून आत्म हत्या केल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या जलजीवन मिशन अंतर्गत राज्यात शास-नाने हर घर जल ही योजना सुरू केली. या माध्यमातून सरकारी कामे काढली गेली होती. सदर कामे सुशिक्षित बेरोजगार अभियंता, छोटे कंत्राटदार यांनी घेतली होती. जवळपास कामे पूर्णही केली. परंतु कंत्राटदार यांनी पुर्ण केलेल्या कामांचे व तसेच केलेल्या कामांचे देयके देण्यासाठी शासनाकडे जवळपास १ वर्षांपासून निधीच उप-लब्ध नाही तसेच केंद्राने ही निधी देऊ शकत नाही असे पत्र राज्य शासनास धाडले आह. कर्जाच्या



पैशासाठी लोकांचा तगादा हर्षल पाटील यांनी स्वत:च्या शेतात जाऊन गळफास घेऊन आत्महत्या करून आपले जीवन संपवलं आहे. त्यांचे शासनाकडे जवळपास १.४० कोटींचे देयके प्रलंबित आहेत. तसेच सावकार व इतर आर्थिक लोकांकडून त्याने जवळपास ६५ लाखांचे कर्ज घेतले होत. तसेच गेल्या अनेक दिवसांपासून तो त्यांच्या मित्रांना मी आत्महत्या करतो हे शासन पैसे देत नाही इतर लोक मला पैशासाठी तगादा लावत आहेत वडिलांना काय सांगू नका असे बोलत असे.

याबाबत व्यवस्था करावी अन्यथा आपण असे नवयुवक,उद्योजक, कंत्राटदार आपले जीवन संपवून टाकतील व आपले कुटुंब नाहक आर्थिक अडचणीत येतील याची शासनास फार मोठी किंमत चुकवावी लागेल, असा इशारा महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ व राज्य अभियंता संघटना व महाराष्ट्र राज्य ग्रामीण पाणीपुरवठा संघटना राज्य अध्यक्ष इंजि मिलिंद भोसले, महासचिव सुनील नागराळे व सर्व पदाधिकारी यांनी शासनास इशारा दिला आहे.

> सदर घटना अत्यंत दुःखद घटना असून हर्षल यांना मी श्रद्धांजली वाहतो आणि त्याच्या कुटुंबाच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. सरकारच्या रोजगार देण्याच्या खोट्या आश्वासनांना कंटाळून सर्व-सामान्य शेतकऱ्यांची पोरं कंत्राटदारीकडे वळली. स्वतःच्या कष्टाच्या जोरावर आपलं विश्व निर्माण करु पाहणाऱ्या युवकांच्या स्वप्नांवर सरकारने पाणी फेरले. राज्य शासनाने निवडणुका जिंकण्यासाठी तिजोरीत पैसे नसतांना विविध कंत्राटांचे वाटप केले. आज थकलेली बिले घेण्यासाठी राज्यातील कंत्राटदार सरकारच्या दारात याचना व आंदोलने करत आहेत. ही एका खात्याची परिस्थिती नसून, सर्वच खात्यांची परिस्थिती आहे.
>
> ●जयंतराव पाटील

> विधिमंडळात अधिवेशन दरम्यान सदरची बाब मी मांडली होती. सदर बाबीकडे वेळीच लक्ष दिले गेले असते तर आज हर्षलचा जीव वाचला असता. आपल्या ५ वर्षाच्या लेकीला हर्षल पोरका करून गेला. सरकारकडे थोडी तरी लाज किंवा शरम असेल तर असे अनेक हर्षल उध्वस्त होण्यापासून वाचवावेत आणि या कंत्राटदारांची बिले वेळेत अदा करावीत.
>
> ●विश्वजित कदम

# भाजपा युती सरकारने महाराष्ट्राचा तमाशा बनवला

## विधानसभेत क्लब तर बाहेर WWF चा आखाडा

### हर्षवर्धन सपकाळ

**मुंबई : हॅलो प्रभात**

महाराष्ट्राला मोठी राजकीय संस्कृती लाभलेली आहे. यशवंतराव चव्हाण ते विलासराव देशमुख, पृथ्वीराज चव्हाण यांच्या काळात महाराष्ट्राचे नाव देशात अभिमानाने घेतले जात होते. पण भाजप सरकारने मागील १० वर्षापासून महाराष्ट्राचा तमाशा करून ठेवला आहे. विधानसभेत पत्याचा क्लब सुरु आहे तर बाहेर WWF चा आखाडा बनला आहे व त्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच जबाबदार आहेत, असा घणाघात हल्लाबोल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.



भाजपा युती सरकारवर तोफ डागत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, हे सरकार लोकशाही माननारे नाही तर हम करे सो कायदा पद्धतीने काम करत आहे. एका मंत्र्यांच्या घरात पैशाने भरलेली बॅग सापडते, दुसरा मंत्री विधानसभेत रमी खेळतो तर गृहराज्य मंत्र्यांच्या आईच्या नावाने खुलेआम पणे डान्सबार सुरु आहे. अशा मंत्र्यांना तात्काळ बरखास्त करायला हवे पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस लाचार, हतबल आहेत. राज्यातील कायदा व सुव्यवस्थेचे तीन तेरा वाजले आहेत. महिला असुरक्षित आहेत, महिला अत्याचारांच्या घटनांमध्ये वाढ होत आहे, गुजरातमधून महाराष्ट्रात ड्रग आणून त्याचा काळा धंदा जोरात सुरु आहे, तरुण पिढीला नशेखोरीत ढकलले जात आहे. आका, कोयता गँग बिनधास्त धुडगुस घालत आ-हेत, अवैध धंद्यांचे पीक जोमात सुरु आहे. कोणालाही पोलीसांचा धाक राहिलेला नाही. ही गुंडगिरी, मवाली संस्कृती आणण्याचे पाप देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.

एका प्रश्नाला उत्तर देताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, ज्येष्ठ नेते शरद पवार व शिव-सेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या, यातून वेगळा अर्थ काढण्याची गरज नाही. महाराष्ट्राची ती राजकीय संस्कृती आहे. राज्यात विरोधकांना शत्रू मानत नाहीत, वैचारिक मतभेद असतात व विचाराची लढाई विचाराने लढली जाते, त्यामुळे या शुभेच्छातून काही राजकीय समिकरण बदलेल असे वाटत नाही, असे हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

# गरजू व्यक्तींना वैद्यकीय साहित्यांचे वाटप



**तासगाव : हॅलो प्रभात**

निमणी येथील गरजू व्यक्तींना आरोग्य संबंधित वेगवेगळ्या वैद्यकीय साहित्यांचे वाटप डॉ. सुधाकर पाटील आणि डॉ. सरला पाटील कुटुंबीयांकडून करण्यात आले. स्व. लक्ष्मण पाटील , स्व. संभाजी पाटील आणि शहाजी पाटील आप्पा यांच्या स्मरणार्थ गावातील सुमारे ८० व्यक्तींना माई पाटील व मान्यवरांच्या हस्ते वैद्यकीय साहित्य वाटप करण्यात आले. याप्रसंगी डॉ. सुधाकर आणि डॉ. सरला यांनी विविध आजाराबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

लहान वयात वडिलांचे छत्र हरविल्यानंतर चुलत्यांनी पोटच्या मुलाप्रमाणे सांभाळ केला. याबाबत कृतज्ञता व्यक्त करणे ही माझी जबाबदारी असल्याचे डॉ. सुधाकर म्हणाले.

दरम्यान गावातील लक्ष्मी यात्रेनिमित्त आयोजित केलेल्या लकी ड्रॉ विजेत्या महिलांना बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी सरपंच रेखा रवींद्र पाटील, उपसरपंच राजेंद्र घोडके, सुधीर पाटील, नवनाथ पाटील, उदय पाटील पोलीस पाटील सतीश पाटील, आशाताई वर्कर्स, आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थित आमचे स्वागत माझी उपसरपंच आर डी पाटील यांनी केले.

अनुजा शेळके यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# तासगावात ‘देवाभाऊ केसरी’ बैलगाडी शर्यतीचे आयोजन

**संदीप गिड्डे-पाटील यांची माहिती**

**तासगाव : हॅलो प्रभात**



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती वर्षानिमित्त आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ५५ व्या वाढदिवसानिमित्त नांगोळे पट्ट्यामध्ये, कडेगाव क. महांकाळ येथे २८ जुलै रोजी ‘देवाभाऊ केसरी’ राज्यस्तरीय भव्य बैलगाडी शर्यत २०२५ या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. यानिमित्त विविध सामाजिक उपक्रमही राबवण्यात येणार आहेत, अशी माहिती भाजप किसान मोर्चाचे प्रदेश सरचिटणीस संदीप गिड्डे - पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.



ते पुढे म्हणाले, या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते होणार असून ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे प्रमुख पाहुणे तर भूषव-तील. सामाजिक अध्यक्षस्थान आ.गोपीचंद पडळकर उपक्रम आणि योगदान या कार्यक्रमात ११,१११ विद्यार्थ्यांना ५५,५५५ शालेय वह्यांचे वाटप करण्यात येणार आहे, ज्यामुळे गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत मिळेल. मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये रु ५,५५,५५५/-चे महत्त्वपूर्ण योगदान देण्यात येणार आहे, जे आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना मदत करण्यासाठी वापरले जाईल. हा एक ऐतिहासिक आणि बैलगाडी शर्यतीच्या उत्साही चाहत्यांसाठी भव्य शर्यत सोहळा असणार आहे, हे पर्वणी ठरेल.

या सोहळ्याला समित कदम, आ. सुरेश खाडे, आ.सुधीर गाडगीळ, पृथ्वीराज देशमुख, सम्राट महाडिक, उदयराजे भोसले, स्वाती सूर्यवंशी, गणेशतात्या भेगडे, आ. सदाभाऊ खोत, आ.सत्यजित देशमुख, संग्राम भाऊ देशमुख यांच्यासह अनेक मान्यवर आणि नेते उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमासाठी परिसरातील नागरिक आणि बैलगाडी शर्यत प्रेमींनी आवाहन राजमाता बैलगाडी शर्यत संघ मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

# सोनवडे शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप



**शाहूवाडी : हॅलो प्रभात**

सोनवडे (ता. शाहूवाडी) पितृस्मृती ही फक्त औपचारिकता न राहता, ती समाजासाठी उपयुक्त ठरावी, या भावनेतून वै. ह.भ.प. शिवाजी विठ्ठल पाटील (कारभारी) सोनवडेकर यांच्या तृतीय पुण्यतिथीनिमित्त एक आगळीवे-गळी श्रद्धांजली वाहण्यात आली. या निमित्ताने सोनवडे येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्य आणि खाऊ वाटप करून सामाजिक बांधिलकी जपली गेली.

हा स्तुत्य उपक्रम त्यांचे सुपुत्र अमोल पाटील व एकनाथ पाटील यांच्या सौजन्याने राबवण्यात आला.

फ्लेक्सबाजी, जाहिराती, आणि भव्य पंगती यांना फाटा देत सामाजिक भान राखत वडिलांच्या स्मृतीला शिक्षणविषयक सेवेद्वारे उजाळा देण्याचा अनोखा उपक्रम केला गेला.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके, पेन्सिली, कंपास, इत्यादी साहित्याचे वाटप करण्यात आले. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचं वातावरण निर्माण झालं. गरजू आणि कमजोर वर्गातील विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरला.

# डॉ. कदम महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे सी.ए. व नेट परीक्षेत यश



**सांगली : हॅलो प्रभात**

भारतीय सनदी लेखाकार संस्थान (सी.ए.) तसेच राष्ट्रीय पात्रता चाचणी (नेट) कडून घेण्यात आलेल्या परीक्षेत भारती विद्यापीठाचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय सांगली येथील आजी,माजी विद्यार्थ्यांनी दोन वेगवेगळ्या परीक्षांमध्ये यश संपादन केले. वाणिज्य विभागातील बी.कॉम. भाग- ३ चा विद्यार्थी सोहम सुनील जोशी याने मे २०२५ मध्ये झालेल्या सी. एस. परीक्षेमध्ये तसेच वनस्पतीशास्त्र विभागातील माजी विद्यार्थिनी कुमारी श्रेया चंद्रकांत कांबळे हिने मे २०२५ च्या नेट परीक्षेमध्ये यश संपादन केले. याबद्दल महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. एस.व्ही.पोरे यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले.

वरील आजी, माजी विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवून भारती विद्यापीठ आणि डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले त्याबद्दल भारती विद्यापीठाचे कार्यवाह, माजी राज्यमंत्री व आमदार मा. डॉ. विश्वजीत कदम, महाविद्यालय विकास समिती व भारती विद्यापीठ शालेय शिक्षण समितीच्या अध्यक्षा मा. विजयमाला कदम तथा वहिनीसाहेब, भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय पुणेचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम, भारती विद्यापीठ मेडिकल फाउंडेशनच्या कार्यकारी संचालिका डॉ. अस्मिताताई जगताप, सहकार्यवाह डॉ. के. डी. जाधव, डॉ. एम. एस. सगरे, महाविद्यालयाचे उपप्रा-चार्य डॉ. अमित सुपले, कनिष्ठ विभागप्रमुख प्रा. ए. एल. जाधव, वाणिज्य विभागप्रमुख डॉ. अनिकेत जाधव, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख प्रा. हर्षल वांगीकर तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी शाबासकी देऊन त्यांचे कौतुक केले व पुढील वाटचालीस त्यांना शुभेच्छा दिल्या.

# विजेचे स्मार्ट मीटर काढून घेण्यास भाग पाडले



**इचलकरंजी : हॅलो प्रभात**

येथील जवाहनगर, हनुमाननगर परिसरात बसवलेल्या विजेच्या स्मार्ट मीटरमुळे जादा वीज बिलं येत आहेत. त्यामुळे नागरीकांनी स्मार्ट मीटरला विरोध करत ती काढुन जुन्या पद्धतीचे मीटर बसवण्याचा तगादा लावला होता. अखेर मंगळवारी वीज मंडळाचे अधिकारी, कर्मचारी दाखल होताच नागरीकांनी त्यांना स्मार्ट मीटर काढुन घेण्यास भाग पाडले.

येथील जवाहनगर, हनुमाननगर परिसरात अनेक ठिकाणी जबरदस्तीने विजेचे स्मार्ट मीटर बसवले आ-हेत. त्यामुळे जादा वीज बिलं येत असल्याने नागरीकांचा त्याला विरोध होत असून स्मार्ट मीटर काढुन घेण्याची मागणी होत आहे. या पार्श्वभूमीवर वीज मंडळाच्या कबनुर आणि जवाहरनगर कार्यालयाचे अधिकारी, कर्मचारी आज भागात दाखल झाले. यावेळी माजी नगरसेवक राजू बोंद्रे यांच्यासह नागरीकांनी परवानगीशिवाय स्मार्ट मीटर बसवल्याने ती काढुन घेण्याची मागणी केली. यावर अधिकाऱ्यांनी केंद्र शासनाच्या योजनेतूनच स्मार्ट मीटर बसवले जात असल्याचे सांगत काही तांत्रिक अडचणी असल्यास त्या दुर करण्याची तयारी दर्शवली. तरीही विरोध करत स्मार्ट मीटर काढुन घेण्यास भाग पाडले. यावेळी काहींची वीज बिलं तपासण्यासाठी घेतली तर काही ठिकाणचे स्मार्ट मीटर काढुन घेतले. याचबरोबर मीटरमध्ये काही तांत्रिक बिघाड आहे काय? हे तपासण्यासाठी ४ ठिकाणच्या स्मार्ट मिटरसोबत नव्याने स्मोर्ट मिटर बसवले आहेत. यावेळी राजु बोंद्रे यांनी स्मार्ट मीटर बसवल्याने जादा बिल येत नाही किंवा येत असल्यास ते का हे नागरीकांना पटवुन देऊनच नव्याने स्मार्ट मीटर बसवण्याची मागणी केली.

# महात्मा गांधी विद्यालयाचे मुख्याध्यापक मनोहर हजारेंचा सत्कार संपन्न

**रुकडी : हॅलो प्रभात**



रयत शिक्षण संस्था संचालित रुकडी(ता.हातकणंगले) येथील महात्मा गांधी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक मनोहर हजारे यांचा सेवापूर्ती सत्कार समारंभ नुकताच उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जे.के.जाधव तर प्रमुख पाहुणे म्हणून आ.जयंत आसगावकर हे उपस्थित होते. प्रारंभी रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील व रयत माऊली लक्ष्मिबाई पाटील यांच्या प्रतिमेचे पुजन व दिप प्रज्वलन प्रमुख मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

तदनंतर मुख्याध्यापक हजारे व त्यांच्या सुविद्य पत्नी यांचा उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते शाल,श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सपत्निक सत्कार करण्यात आला. दरम्यान या सत्कारास उत्तर देताना मुख्याध्यापक मनोहर हजारे म्हणाले की,माझ्या शिक्षकी क्षेत्रात मोठ मोठी माणसं माझ्या सानिध्यात आली.त्यांच्या प्रे-रणेने मी अनेक कार्यात यशस्वी झालो. रुकडी शाखेचे कार्य माझ्या मनासारखं झालं. मी माझ्या संपुर्ण जिवनात सात्विकपणे जगलो. सात्विक माणसे जोडली. माझी रुकडी गावातील संस्थेत भरभराट झाली. हि शाळा व पंचक्रोशीने मला भरभरून प्रेम दिले.जाईल तेथे चांगले संस्कार घेत गेलो.

मुख्याध्यापक असलो तरी सर्व शिक्षक सहकार्यांना सोबत घेऊन कार्यरत राहिलो.माझ्या शब्दांना सर्वांनी मान दिला. त्यामुळे या संस्थेचे व संस्थेतील सर्व पदाधिकारी व शिक्षक सहकारी यांचे मोलाचे सहकार्य आणि ऋण कधीही विसरु शकणार नाही असे भावनिक उद्गार मनोहर हजारे यांनी व्यक्त केले.

यावेळी चिंतामणी मगदू, बी.बी.तिपोळे, आर.एन. परिट, धनाजी बकरे, अमोलदत्त कुलकर्णी, अभिनंदन खोत, भगवान पोळ, सर्जेराव कांबळे, के. एम. भोसले, अविनाश बनगे, प्रा. राम चट्टे, इत्यादी मान्यवर, तसेच एन.सी.सी.छात्र ऊपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.सविता पडदुणे व मनीषा महिंद यांनी केले. तर शेवटी आभार प्रदर्शन नवनाथ पाटील यांनी मानले.

# टिळकांची देशभक्ती जीवन गौरवाने स्मरणात ठेवा

### डॉ.बी.एम.पाटील

**तासगांव : हॅलो प्रभात**



येथील संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे महिला शिक्षण शास्त्र महाविद्यालय तासगाव येथे आज लोकमान्य टिळकांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन प्रशिक्षणार्थींमध्ये समतेच्या मूल्यांची व देशभक्तीची प्रेरणा निर्माण व्हावी या उद्देशाने करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुव-ात भित्तिपत्रिकेचे प्रकाशन प्राचार्यांच्या हस्ते करून करण्यात आली त्यानंतर दीपप्रज्वलन व लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. प्रशिक्षणार्थी ललिता बामणे व मुक्ताई मिसाळ यांनी टिळकांच्या जीवनावर आपले मनोगत सादर केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.एम.पाटील यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच, या ठाम विचारांनी लोकमान्य टिळकांनी जनतेत स्वातंत्र्याची ज्वाला पेटवली.शिक्षण, समाजसुधारणा आणि पत्रकारितेच्या माध्यमातून त्यांनी भारतीय जनतेला संघटित करण्याचे कार्य केले. भारताच्या स्वातंत्र्यलढ्याला नवे वळण देणारे, जनतेत राष्ट्रभक्ती जागवणारे टिळक हे खरे अर्थाने लोकमान्य होते. आजच्या युगात टिळकांचे देशभक्तीचे व तेजस्वी जीवन गौरवाने स्मरणात ठेवण्याचे गरज आहे असे मत प्रतिपादित केले.

सदर कार्यक्रमास महाविद्यालयातील प्रा.डॉ. एल.व्ही.भंडारे,डॉ.ए एस.चिखलीकर,डॉ.डी.टी. खजूरकर,प्रा.ए.आर.पंडित तसेच कार्यालयीन कर्मचारी श्री.संजय कुंभार, हणमंत वाघमारे,सुजाता हजारे, अस्मिता साळी हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रियंका लोहार व वर्षाराणी कोष्टी यांनी केले.

सदर कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.प्रमोद शेंडगे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार स्मिता माने यांनी केले.

# सर्जेराव माईंगडे यांना ‘यशवंतराव चव्हाण’ पुरस्कार जाहीर

**शिराळा : नारायण घोडे पाटील**

शाहूवाडी तालुक्यातील तुरुकवाडी गावचे सुपुत्र व विघ्नहर्ता ग्रुपचे संस्थापक सर्जेराव माईंगडे यांना सामाजिक व उद्योग क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी बद्दल यशवंत चव्हाण फाऊंडेशन मुंबई यांच्या वतीने देण्यात येणारा ‘यशवंतराव चव्हाण’ पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. याबाबतचे निवडपत्र संस्थेचे संस्थापक संजय सावंत यांनी माईंगडे यांना नुकतेच पाठवले आहे.



सर्जेराव माईंगडे हे वाढदिवसाच्या निमित्ताने दरवर्षी तुरुकवाडी परिसरात रक्तदान शिबीर, शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करतात. शाहूवाडी येथील आश्रम शाळेसही सातत्याने सहकार्य करित आहेत.त्यांनी दोन वर्षांपूर्वी कोरोना तसेच महा पुराच्या काळात जीवनावश्यक वस्तुंचे वाटप केले आहे. शाळेला लागणारे साहित्य दिले आहे. अनेक गोरगरीबांना आर्थिक सहकार्य केले आहे. याचीच दखल घेऊन हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार १५ ऑगस्ट रोजी मुंबई येथील कार्यक्रमात प्रदान करण्यात येणार आहे.

# व्यवसायिकांसाठी खुशखबर

सांगली, कोल्हापूर, सातारा, सोलापूर, पुणे,
अहमदनगर सह संपूर्ण महाराष्ट्रात
डिजिटलच्या माध्यमातून तब्बल सात लाख वाचकांपर्यंत
पोहोचणाऱ्या दैनिक **हॅलो प्रभात** सोबत
आपल्या व्यवसायाची जाहिरात करण्याची...



## सुवर्णसंधी



| जाहिरात साईज | प्रसिद्धी कालावधी | किंमत |
|---|---|---|
| 08X05 cm | संपूर्ण महिना | ५000/- |
| 08X10 cm | संपूर्ण महिना | ७000/- |
| 12X10 cm | संपूर्ण महिना | १0000/- |

टीप : सदर जाहिरातीचे दर हे फक्त डिजिटल आवृत्तीसाठी लागू आहेत.

**शुभेच्छा जाहीरात, जाहीर नोटीस,**
**छोट्या जाहीराती, टेंडर नोटीस व सर्व प्रकारच्या**
**जाहीरात प्रसिद्धीसाठी...**

## एकवेळ अवश्य संपर्क साधा

# दै.हॅलो प्रभात

**फोन : 9094277171 / 9011889001**

• छापील प्रत मिळिवण्यासाठी संपर्क : 9021651976